# मंत्रिमंडळ निर्णय

**२२ मे २०१७**

**( बैठक क्र. १३१ )**

| अ.क्र. | विषय | विभाग |
|---|---|---|
| १ | महापारेषणचे मनोरे आणि वाहिन्यांची उभारणी<br>**शेतकऱ्यांना आता दुप्पट नुकसान भरपाई मिळणार** | ऊर्जा |
| २ | अटल सौर कृषी पंप योजनेंतर्गत २४६० सौर कृषिपंपांची उभारणी | ऊर्जा |
| ३ | आपत्ती व्यवस्थापन कार्यक्रमास दोन वर्षांची मुदतवाढ | मदत व पुनर्वसन |
| ४ | घोडागाडी चालक – मालकांच्या पुनर्वसन योजनेस मान्यता | गृह |
| ५ | राज्यात मेंढी पालन व्यवसायाच्या वाढीसाठी राजे यशवंतराव होळकर महामेष योजना | पदुम |

## महापारेषणचे मनोरे आणि वाहिन्यांची उभारणी

# शेतकऱ्यांना आता दुप्पट नुकसान भरपाई मिळणार

राज्यातील ६६ के.व्ही. ते १२०० के.व्ही. पारेषण वाहिन्यांसाठी उभारण्यात येणाऱ्या मनोऱ्यासाठी लागणाऱ्या जागेच्या मोबदल्यात वाढ करून ती जमिनीच्या मुल्याच्या दुप्पट करण्यात आली आहे. तसेच अशा प्रकारच्या पारेषण वाहिनीच्या तारेखालील जमिनीचा मोबदला देण्याचा प्रस्ताव आज राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत मंजूर करण्यात आला. या निर्णयामुळे राज्यातील अशा कामांशी संबंधित शेतकऱ्यांचा मोठा फायदा होणार आहे.

राज्यात विविध शासकीय व खाजगी पारेषण परवानाधारक कंपन्यांतर्फे ६६ के.व्ही. ते १२०० के.व्ही. अतिउच्चदाब उपकेंद्रे व विद्युत वाहिन्या उभारल्या जात आहेत. या वाहिन्या बऱ्याचदा शहरी व ग्रामीण भागातील शेतजमिनींसह इतर जमिनींवर उभारण्यात येतात. त्यात जमीनधारकांच्या जमिनीचे अवमुल्यन होत असल्याने त्यांच्याकडून विरोध होतो. सध्या राज्यात महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी लि. (महापारेषण) तर्फे वेगवेगळ्या दाब स्तराच्या ८२ वाहिन्यांची कामे सुरु आहेत. जमीनधारकांचे नुकसान टळावे यासाठी मनोऱ्याखालील व्यापलेल्या जमिनीसाठी सध्या जमिनीच्या प्रकारानुसार रेडीरेकनरच्या २५ ते ६५ टक्क्यांपर्यंत मोबदला दिला जातो. तसेच मनोरा अथवा वाहिनी उभारताना पिके, फळझाडे यासह इतर झाडांच्या नुकसानीची भरपाई महसूल विभागामार्फत मुल्यांकन करून संबंधितास दिली जाते. मात्र, वाहिनीच्या तारेखालील जमिनीचा (Line Corridor) कोणताही मोबदला दिला जात नाही.

केंद्र सरकारने याबाबत सर्व राज्यांसाठी मार्गदर्शक सूचना दिल्या आहेत. त्यानुसार मनोरा व्याप्त जमिनीचा मोबदला हा जमिनीच्या मुल्याच्या ८५ टक्के इतक्या प्रमाणात प्रदान करण्याच्या तर पारेषण वाहिनीच्या तारांखालील जमिनीच्या मुल्याच्या १५ टक्के इतक्या प्रमाणात भरपाई देण्याच्या सूचना आहेत. मात्र, मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत राज्यातील शेतकऱ्यांना अधिकाधिक भरपाई मिळावी यासाठी केंद्राच्या सुत्रात वाढ करण्यात आली. त्यानुसार मनोऱ्याने व्यापलेल्या जमिनीच्या रेडीरेकनरप्रमाणे निश्चित मुल्याच्या दुप्पट भरपाई देण्यात येणार आहे. वाहिनीच्या तारेखालील जमिनीच्या भरपाईच्या बाबतीत केंद्राप्रमाणेच १५ टक्के इतक्या प्रमाणात भरपाई दिली जाईल. फळझाडे, पिके व इतर झाडांच्या भरपाईच्याबाबतीत सध्या प्रचलित असलेल्या धोरणाप्रमाणे भरपाई दिली जाईल. या निर्णयानंतर उभारण्यात येणाऱ्या प्रकल्पांसाठीच ही भरपाई लागू राहणार आहे.

हा निर्णय महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी, पॉवर ग्रीड कॉर्पोरेशन ऑफ इंडिया कंपनी लि. या शासकीय तसेच खाजगी पारेषण परवानाधारक कंपन्यांकडून उभारण्यात येणाऱ्या सर्व ६६ के.व्ही. व त्यावरील अतिउच्चदाब वाहिन्या, एचव्हीएसी अथवा डीसी पारेषण वाहिन्यांसाठी लागू राहणार आहे.

शहरी भागात मोबदला देण्यासाठी अतिउच्चदाब वाहिन्यांबाबत केंद्र शासन स्तरावर समिती स्थापन करण्यात आली आहे. मुंबई महापालिका व उपनगरीय क्षेत्रातील जमिनीचे दर जास्त असल्यामुळे सुधारित नवीन धोरण मुंबई व उपनगरे वगळून लागू होईल. अतिउच्चदाब मनोऱ्याने व्यापलेल्या जमिनीचा मोबदला ठरविण्यासाठी उपविभागीय अधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती स्थापन करण्यात येणार आहे.

जमिनीचा मोबदला शेतकऱ्याला देण्यात आल्यास त्याची सातबारावर नोंद करण्यात येईल. ही रक्कम मनोरा पायाभरणीनंतर व उभारणीनंतर अशा दोन टप्प्यात देण्यात येणार आहे. तारेखालील जमिनीचा मोबदला प्रत्यक्ष वाहिनी उभारल्यावर देण्यात येणार आहे. ज्या जमिनीवरुन फक्त तारा गेल्या अशा ठिकाणी तारेखालील जमिनीचा मोबदला प्रत्यक्ष वाहिनी उभारल्यानंतर देण्यात येईल. जमिनीच्या मालकाचा बदल झाल्यास नवीन मालक पात्र ठरणार नाही. संबंधित शेतकऱ्यास हा मोबदला मान्य नसल्यास तो जिल्हाधिकाऱ्यांकडे अपील करू शकणार आहे.

-----०-----

ऊर्जा विभाग

## अटल सौर कृषी पंप योजनेंतर्गत<br>२४६० सौर कृषिपंपांची उभारणी

अटल सौर कृषी पंप योजनेंतर्गत केंद्र शासनाने मान्यता दिलेल्या २४६० सौर कृषी पंपांची उभारणी करण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली.

सौर कृषी पंपांची उभारणी करण्यासाठी यापूर्वी आत्महत्याग्रस्त सहा जिल्हे आणि सध्या या योजनेत समावेश असलेले इतर जिल्हे यांच्यातील वाटपाचे ८० टक्के आणि २० टक्के असे सध्या असलेले प्रमाण रद्द करून ते आता ५०-५० टक्के करण्यात आले आहे. तसेच या योजनेत समावेश असलेल्या जिल्ह्यांव्यतिरिक्त उर्वरित जिल्ह्यांचा समावेश करण्यासह या योजनेस डिसेंबर २०१७ पर्यंत मुदतवाढ देण्यासाठी केंद्र शासनास विनंती करण्यास आजच्या बैठकीत मान्यता देण्यात आली.

औष्णिक वीज निर्मितीस असलेल्या मर्यादा आणि तिचा हवामानावर होणारा विपरित परिणाम यांचा विचार करता शेतकऱ्यांना शाश्वत व निरंतर स्वरुपाच्या उर्जेचा स्त्रोत असणारे सौर पंप देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यानुसार राष्ट्रीय स्तरावर एक लाख सौर कृषी पंपांच्या योजनेसाठी ४०० कोटींची तरतूद घोषित करण्यात आली होती. याअंतर्गत महाराष्ट्रासाठी १० हजार कृषिपंपासाठी मान्यता देण्यात आली होती. त्यानुसार मार्च २०१५ मध्ये ७५४० सौर पंपांच्या उभारणीस मान्यता देण्यात आली होती. उर्वरित २४६० सौर कृषी पंपांच्या उभारणीस आज मान्यता देण्यात आली.

या योजनेंतर्गत राज्यातील अकोला, अमरावती, वाशिम, बुलढाणा, यवतमाळ व वर्धा या सहा आत्महत्याग्रस्त जिल्ह्यांचा प्रामुख्याने समावेश आहे. सौर कृषी पंपांची जिल्हावार वाटप करण्याचे अधिकार या योजनेखाली स्थापन करण्यात आलेल्या सुकाणू समितीस देण्यात आले असून या समितीने १० हजार सौर कृषी पंपांसाठी निविदा प्रकाशित करण्याचे निर्देश दिले होते. त्यानुसार यापूर्वी राज्यात ७५४० सौर कृषी पंपांची उभारणी करणे सुरू आहे. उर्वरित २४६० सौर कृषी पंपांची उभारणी करण्यास आज मान्यता देण्यात आली. त्यापैकी ८० टक्के पंपांची आत्महत्याग्रस्त सहा जिल्ह्यांमध्ये तर उर्वरित २० टक्के पंपांची योजनेतील इतर जिल्ह्यांत म्हणजेच नागपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, चंद्रपूर, उस्मानाबाद, हिंगोली, जालना, बीड, जळगाव, नंदूरबार, रायगड, ठाणे, पालघर, नाशिक व रत्नागिरी या जिल्ह्यांमध्ये उभारणी करण्यात येत होती. वाटपाच्या या सुत्रात बदल करण्यात आला असून आता हे वाटप निम्मे-निम्मे प्रमाणात करण्यात आले आहे.

-----०-----

मदत व पुनर्वसन

## आपत्ती व्यवस्थापन कार्यक्रमास
## दोन वर्षांची मुदतवाढ

महाराष्ट्र राज्य आपत्ती व्यवस्थापन कार्यक्रमास ३१ मार्च २०१९ पर्यंतच्या दोन वर्षांच्या कालावधीसाठी मुदतवाढ देण्यासह या कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसाठी ४० पदांना मुदतवाढ देण्याचा निर्णय आज मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आला.

महाराष्ट्र राज्य आपत्ती व्यवस्थापन कार्यक्रमांतर्गत विभागीय आणि जिल्हास्तरावर कार्यरत असलेल्या ४० पदांना दि.१ एप्रिल २०१७ ते ३१ मार्च २०१९ या २ वर्षाच्या कालावधीसाठी किंवा या कार्यक्रमासाठी निर्माण करण्यात आलेल्या पदांवर रितसर नियुक्त्या होईपर्यंत (यापैकी जे आधी घडेल त्या कालावधीसाठी) मुदतवाढ देण्यात आली आहे. या कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसाठी जिल्हास्तरावर कार्यरत जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी आणि विभागीय स्तरावर कार्यरत विभागीय आपत्ती व्यवस्थापन समन्वयक या पदास ३० हजार एवढे ठोक मानधन देण्यासदेखील मंजुरी देण्यात आली. महाराष्ट्र राज्य आपत्ती व्यवस्थापन कार्यक्रमांतर्गत राबविण्यात येणाऱ्या कामांसाठी वार्षिक १३ कोटी इतक्या निधीसही या बैठकीत मान्यता देण्यात आली.

-----o-----

गृह विभाग

## घोडागाडी चालक – मालकांच्या
## पुनर्वसन योजनेस मान्यता

मुंबई शहरात पर्यटकांच्या मनोरंजनासाठी चालविण्यात येणाऱ्या घोडागाडी आणि व्हिक्टोरिया बंद करण्यात आल्यानंतर त्यांच्या पुनर्वसनासाठीच्या योजनेस आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. याबाबत उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार स्थापन करण्यात आलेल्या मंत्रिमंडळ उपसमितीने शिफारशी केल्या होत्या.

न्यायालयाच्या घोडागाडी बंद करण्याच्या निर्णयामुळे सुमारे ९१ घोडागाडी मालक व १३० घोडागाडी चालक बाधित होणार आहेत तसेच त्यांच्याकडे असणाऱ्या घोड्यांचेही पुनर्वसन होणे आवश्यक आहे हे लक्षात घेऊन उपसमितीने केलेल्या शिफारशींनुसार संबंधित घोडागाडी चालक व मालक यांना बृहन्मुंबईमध्ये उपलब्ध असलेल्या जागेवर पथविक्रीबाबतच्या निकषांनुसार फेरिवाला परवाना देण्याचा निर्णय घेण्यात आला. तसेच फेरिवाला परवाना प्राप्त केलेल्या या बाधित घोडागाडी चालकांना १ लाख रुपये एका वेळची एकरकमी आर्थिक मदत देण्यात येणार आहे. फेरिवाला परवाना न घेतल्यास ३ लाख रुपयांची एकवेळची एकरकमी आर्थिक मदत देण्याचा निर्णय घेण्यात आला. यापूर्वीच मंत्रिमंडळ उपसमितीने केलेल्या शिफारशीनुसार नगर विकास विभागाने घोडागाडी चालकांचे व्यवसायबाधित व्यक्ती म्हणून ९ जानेवारी २०१७ रोजी प्रसिद्ध केलेल्या पथविक्रेता योजना (उपजीविका संरक्षण व पथविक्री विनियम) (महाराष्ट्र) योजनेत समाविष्ट करण्यासाठी तरतूद केली आहे.

-----o-----

# राज्यात मेंढी पालन व्यवसायाच्या वाढीसाठी राजे यशवंतराव होळकर महामेष योजना

मेंढी पालनाच्या व्यवसायास प्रोत्साहन देण्यासाठी राज्यस्तरीय योजनेंतर्गत ६ मुख्य घटकांसह राजे यशवंतराव होळकर महामेष ही नवीन योजना राबविण्याचा निर्णय आजच्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. या योजनेसाठी लागणाऱ्या ४६ कोटी २७ लाख रुपयांच्या खर्चासही मान्यता देण्यात आली.

राज्यातील भटक्या जमाती-क या प्रवर्गातील म्हणजेच धनगर व तत्सम जमातींमधील सुमारे एक लाख कुटुंबियांकडून भटकंतीच्या स्वरुपात मेंढी पालन व्यवसाय केला जातो. त्यामुळे या समुहाला सामाजिक, शैक्षणिक व आर्थिक स्थैर्य मिळवून देण्यासाठी शासनामार्फत मेंढीपालन या पारंपरिक व्यवसायास प्रोत्साहन देण्यात येत आहे. जागतिक पातळीवरील मेंढ्यांच्या मांसाचे सेवन मोठ्या प्रमाणावर करण्यात येते. तसेच देशातील दक्षिण भागातील राज्यांमध्ये मेंढीच्या मांसाला मोठ्या प्रमाणात मागणी आहे. त्यामुळे मेंढ्यांच्या मासांच्या निर्यातीस मोठ्या प्रमाणावर वाव आहे. मेंढीपालन व्यवसाय ठाणबंद पद्धतीने केल्यास त्यातून प्राप्त होणाऱ्या घटकांची (मांस, दुध, लोकर इ.) व्यापारी दृष्टिकोनातून उत्पादने घेता येऊ शकतील. परिणामी, या व्यवसायातील नफा क्षमता वाढण्यास आणि मेंढीपालन व्यवसाय किफायतशीर होण्यात मदत होईल. त्यादृष्टीने आज घेण्यात आलेला निर्णय महत्त्वाचा आहे.

राज्यात मेंढी पालनास प्रोत्साहन देण्यासाठी ७५ टक्के अनुदानावर मेंढीगटाचे वाटप करण्यासंदर्भात नवीन योजना सुरू करण्याची घोषणा यंदाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनामध्ये करण्यात आली होती. त्यानुसार ६ मुख्य घटकांसह नवीन योजनेस मंत्रिमंडळाने आज मंजुरी दिली. मुंबई व मुंबई उपनगर हे दोन जिल्हे वगळता उर्वरित ३४ ग्रामीण जिल्ह्यांतील भटक्या जमातीला (भज-क) या योजनेचा लाभ होणार आहे. योजनेच्या घटकांमध्ये २० मेंढ्या व १ मेंढा या प्रमाणात पायाभूत सुविधेसह एक हजार मेंढीगट वाटप करणे, तसेच या योजनेचे लाभार्थी नसणाऱ्या व स्वत:च्या मेंढ्या असणाऱ्या मेंढपाळास सुधारित प्रजातीचे ५३४० नर मेंढे वाटप करणे, स्वत:च्या मेंढ्या असणाऱ्या एक हजार मेंढपाळांना पायाभूत सोयी-सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी अनुदान, सुमारे १३ लाख मेंढ्यांसाठी संतुलित खाद्य पुरविण्यासाठी अनुदान, कुट्टी केलेल्या हिरव्या चाऱ्याचे मूरघास बनविण्यासाठी गासड्या बांधण्याची २५ यंत्रे खरेदी करण्यास प्रोत्साहन आणि राज्यात पाच ठिकाणी पशुखाद्य कारखाने निर्माण करण्यासाठी प्रोत्साहन अनुदान यांचा समावेश आहे.

या योजनेंतर्गत पायाभूत सोयी-सुविधेसह मेंढीगट वाटप, सुधारित जातीचे नर मेंढे वाटप तसेच मेंढीपालनासाठी पायाभूत सोयी-सुविधा व मेंढ्यांसाठी पशुखाद्य पुरविण्यासाठी ७५ टक्के अनुदान मिळणार असून २५ टक्के लाभार्थ्यांचा हिस्सा राहणार आहे. त्याचप्रमाणे कुट्टी केलेल्या हिरव्या चाऱ्याचा मूरघास बनविण्यासाठी गासड्या बांधण्याचे २५ यंत्र (Mini Silage Baler cum Wrapper) खरेदीसाठी (चार लाख मर्यादेपर्यंत) आणि मेंढ्यांसाठी पशुखाद्य तयार करणारे कारखाने उभारण्यासाठी ५० टक्के अनुदान (पाच लाख मर्यादेपर्यंत) मिळणार आहे. योजनेनुसार २० मेंढ्या व १ मेंढानर (स्थायी-५०० व स्थलांतरित-५००) असे एकूण एक हजार मेंढीगटाचे वाटप करण्यात येणार असून पुढील १० वर्षात सुधारित प्रजातीचे सुमारे ५३ हजार ४०० नर मेंढे वाटप करण्यात येतील. त्यापैकी यावर्षी ५३४० नर मेंढे वाटप करण्यास मान्यता देण्यात आली.

त्याचप्रमाणे मेंढी गट योजनेचे लाभार्थी नसलेल्या व ज्यांच्याकडे स्वत:च्या मेंढ्या आहेत अशा मेंढपाळांसाठी २० मेंढ्या व १ मेंढानर असलेल्या ५०० लाभार्थ्यांस (स्थायी ५०, स्थलांतरित ४५०) आणि ४० मेंढ्या व २ मेंढा नर असलेल्या ५०० लाभार्थ्यांस (स्थायी ५०, स्थलांतरित ४५०) मेंढीपालनासाठी पायाभूत सोयी-सुविधा पुरविण्यास देखील मान्यता देण्यात आली. या योजनेचे लाभार्थी नसलेल्या, मात्र स्वत:च्या मेंढ्या असलेल्या मेंढपाळांकडील स्थायी स्वरुपात पाळण्यात येणाऱ्या १ लाख २९ हजार आणि स्थलांतरित स्वरुपात पाळण्यात येणाऱ्या ११ लाख ६१ हजार एवढ्या मेंढ्यांसाठी संतुलित खाद्य पुरविण्यास देखील मान्यता देण्यात आली. लाभार्थ्यांची निवड करण्याचे अधिकार जिल्हास्तरीय समितीस देण्यात आले आहेत.

माडग्याळ मेंढी संशोधन व संवर्धन केंद्राच्या स्थापनेसाठी माडग्याळ मेंढीचे उगमस्थान असलेल्या माडग्याळ गावच्या ग्रामपंचायतीकडून आवश्यक जागा महामंडळाकडे हस्तांतरित झाल्यानंतर माडग्याळ येथे आणि सांगली जिल्ह्याच्या कवठेमहांकाळ तालुक्यातील रांजणी या दोन ठिकाणी केंद्र स्थापन करण्यास तत्त्वता मान्यत: देण्यात आली.

-----०-----